महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा.क्र: तंशिविकापु/विवि/अतारांकित प्रश्न ७९३९७/२०२४/ २५७८ — दिनांक २९.०६.२०२४

29 JUN 2024

**तात्काळ/विधानमंडळ प्राधान्य:**

प्रति,
संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
**अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एचएमसीटी/एमबीए/एमसीए**
पदवी व पदव्युत्तर-पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था.
पुणे विभाग.

**विषय : विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक ७९३९७**
राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेताना विद्यार्थ्यांकडून आकारली जाणारी अनामत रक्कम शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना परत करणेबाबत..

संदर्भ : १) शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. विपप्र-२०२४/३५/तांशि-३, दि २६.०६.२०२४.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/अनामत रक्कम/२०२४/४२१ दिनांक २९.०६.२०२४

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, विधानसभेत विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणारी अनामत रक्कम किती असते याची माहिती शासनास सादर करावयाची आहे. त्यासाठी आपल्या संस्थेकडून आकारण्यात येणारी **अनामत रकमेची माहिती संस्थेच्या लेटरहेडवर संस्थाप्रमुखांच्या स्वाक्षरीसह** या विभागीय कार्यालयास सोबत जोडलेल्या गुगल फॉर्म लिंकमध्ये भरुन **तात्काळ** सादर करावी.

**ज्या संस्थांमध्ये अभियांत्रिकी, एमबीए किंवा एमसीए अभ्यासक्रम एकाच डिटीई कोडखाली राबविण्यात येत असतील तर त्यांनी अनामत रकमेची एकत्रित माहिती लेटरहेडवर भरुन, प्रत्येक अभ्यासक्रम/स्तर निहाय स्वतंत्र माहिती गुगल फॉर्ममध्ये भरावी.**

| संस्थेचे नाव व डीटीई कोड | अभ्यासक्रमाचे नाव | स्तर | संस्थेचा प्रकार | आकारण्यात येणारी अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| | १. अभियांत्रिकी,<br>२. औषधनिर्माणशास्त्र,<br>३. वास्तुशास्त्र, ४. एचएमसीटी,<br>५. एमबीए, ६. एमसीए इत्यादी | पदवी / पदव्युत्तर पदवी | शासकीय (स्वायत्त / बिगर स्वायत्त),<br>अशासकीय अनुदानीत,<br>खाजगी विनाअनुदानीत | |

**सदर माहिती विधानसभेत सादर करावयाची असल्याने प्रथम प्राधान्याने ही माहिती कळविण्यात यावी.**

गुगल फॉर्म लिंक: https://forms.gle/5mi1bGSJ84ZcbrCk7

**(डॉ. द. व्यं. जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.